महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ३५/प्रनिप्रा/४e५

दिनांक : 28 MAY 2021

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २१ मे, २०२१ रोजी सकाळी ११:०० वा. व दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या २३ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर,<br>माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक<br>(दूरदृष्य प्रणालीद्वारे) | .... | सदस्य |
| २) | डॉ. धनराज माने,<br>संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.,<br>(दूरदृष्य प्रणालीद्वारे) | .... | सदस्य |
| ३) | श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.),<br>सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा<br>आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. | .... | सचिव |

१) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ३) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. अरुणकुमार व्यास, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १ : खालील तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १) | वैद्यकीय शिक्षण (प्रथम सत्र) | MSPO (M.O.Th.) |
| २) | उच्च शिक्षण (द्वितिय सत्र) | B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) |

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी त्यांचे क्रमांक संवैशिवसं/कागदपत्र पडताळणी/प्रनिप्रा/शै.व. २०२०-२१, दिनांक १४/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये "..........कोरोना आजाराच्या साथीमुळे राज्यात लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे उक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशांची पडताळणी या संचालनालयाकडून पुर्ण करता येणे शक्य झालेले नाही, तरी राज्यातील टाळेबंधी संपुष्टात आल्यानंतर वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालयाकडून BPTH-BOTH, BASLP, BP&O, B.Sc. (Nursing) व MPTH, M.Sc.SLP, M.Sc. (Audiology), M.Sc. P&O या अभ्यासक्रमांची प्रवेश पडताळणी पुर्ण करण्यात येईल व तद्नंतर प्रवेश नियामक प्राधिकरणास अहवाल सादर करण्यात येईल." असे प्राधिकरणास कळविलेले आहे.

तसेच शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांनी क्रमांक बीएड-३७२१/ प्र.क्र. ४९/सीईटीसेल/६५०७, दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कोविड-१९ च्या वाढत्या पादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांची पडताळणी/छाननी करणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींचे अवलोकन केले असता, संबंधीत संचालकांनी प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून संबंधीत महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मंजुरीच्या प्रस्तावास अनुसरुन संचालनालयाने किती दिवसांत प्रवेश प्रमाणित करुन अहवाल सादर करावा, याबाबत कोणतेही निर्देश नाहीत, सबब वरील बाबी विचारात घेता सांगोपांग चर्चा करुन प्रवेश नियामक प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिले,-

अ) प्रथम सत्र :-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक MSPO (M.O.Th.)अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी उक्त नमूद अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रक्रिया केली नसल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी या अनुषंगाने संबधीतांवर अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २० अन्वये कायदेशीर दंडात्मक



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

कारवाई करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे व तद्नुषंगाने संबंधीत महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करता येणार नाही, याकरिता सर्वस्वी जबाबदार संबंधीत महाविद्यलयास ठरविण्यात येत आहे, तसेच या संदर्भात संबंधीत सर्व महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.

२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आलेले आहे, तथापि बहुतांशी महाविद्यालयांनी अद्याप प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही, असे निर्दशनास आले आहे.

सद्यस्थितीतील कोविड-१९ विषाणूंच्या वाढत्या पादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करण्याकरिता संबंधीत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दिनांक ३१ मे २०२१ रोजी पर्यंत मूदत वाढ देण्यात येत आहे. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमास १५ टक्के अनिवासी भारतीय कोटयांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर पुनश्च तपासणी/छाननी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी नियमाप्रमाणे छाननी करुन अशा विद्यार्थ्यांचा अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणापुढे ठेवावा.

४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करण्यात आली, सदरील छाननी/तपासणी दरम्यान काही प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये संधिग्दता दिसून आली, या अनुषंगाने सदरील प्रमाणपत्रांची सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर फेरतपासणी/शहानिशा करुन केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

५) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पडताळणी झालेली नसल्याने सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील MSPO (M.O.Th.) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी/छाननी प्रक्रिया दिनांक १५/०६/२०२१ रोजी पर्यंत संचालनालय स्तरावर पुर्ण करण्यात येईल, असे संचालनालयाचे प्रतिनीधी डॉ. व्यास यांनी प्राधिकरणास अवगत केले, या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.



२८/५/२१ (प्रे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

ब) द्वितिय सत्र :-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांना सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी उक्त नमूद अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रक्रिया केली नसल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी या अनुषंगाने संबधीतांवर अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २० अन्वये कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे व तद्नुषंगाने संबंधीत महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करता येणार नाही, याकरिता सर्वस्वी जबाबदार संबंधीत महाविद्यलयास ठरविण्यात येत आहे, तसेच या संदर्भात संबंधीत सर्व महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना निर्देश देण्यात आले.

२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आलेले आहे, तथापि बहुतांशी महाविद्यालयांनी अद्याप प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला नाही, असे निर्दशनास आले आहे.

सद्यस्थितीतील कोविड-१९ विषाणूंच्या वाढत्या पादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करण्याकरिता संबंधीत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दिनांक ३१ मे २०२१ रोजी पर्यंत मूदत वाढ देण्यात येत आहे. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमास १५ टक्के अनिवासी भारतीय कोटयांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर पुनश्च तपासणी/छाननी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी नियमाप्रमाणे छाननी करुन संबंधीत विद्यार्थ्यांचे अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणापुढे सादर करावेत.

४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करण्यात आली, सदरील छाननी/तपासणी दरम्यान काही प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये संधिग्दता दिसून आली, या अनुषंगाने सदरील प्रमाणपत्रांची सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर फेरतपासणी/शहानिशा करुन केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.



२४/५/२१
(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

५) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पडताळणी झालेली नसल्याने सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील B.Ed./M.Ed. (Integrated) व B.A./B.Sc.(Integrated) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी/छाननी प्रक्रिया संचालनालय स्तरावर लवकर करण्यात येईल, असे सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी प्राधिकरणास अवगत केले, या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक १५ जुलै २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात येईल.

विषय क्रमांक ४ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

निरंक

वरीलप्रमाणे विषय/अभ्यासक्रमनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : २८|६|२१